महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जावक क्र.मआ/साप्रवि/आस्था-४/७९९७
दिनांक :२९/०६/२०२०

## -: परिपत्रक :-

**विषय** : राज्य/केंद्र शासन सेवेतून अथवा राज्य/केंद्र शासनाच्या स्वायत्त संस्थेतील सेवेतून पुणे महानगरपालिका आस्थापनेवर सामावून घेणेबाबत सर्वकष सूचना.

राज्य/केंद्र शासन सेवेतील अथवा राज्य/केंद्र शासनाच्या स्वायत्त संस्थेतील अधिकारी/कर्मचारी यांचेकडून पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील विविध पदांवर कायमस्वरूपी सामावून घेणेची मागणी केली जाते. तथापि अनेकवेळा पुणे महानगरपालिकेने मागणी केलेली नसताना, रिक्त नसलेल्या पदांवर, महापालिकेस आवश्यक नसणाऱ्या पदांवर किंवा समकक्ष नसणाऱ्या पदांवर स्वतःच्या वैयक्तिक सोयीसाठी सामावून घेण्याची मागणी केली जाते.

या संदर्भात राज्य शासनाने मंजूर केलेल्या पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मधील नियम (६) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे,

"**६. अन्य महानगरपालिकेतून पुणे महानगरपालिकेत बदलीने नियुक्ती** – या नियमात अन्यत्र काहीही नमूद केले असेल तरी, अन्य सम संवर्गीय महानगरपालिकेतील, एखाद्या कर्मचाऱ्याने बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास, किंवा पुणे महानगरपालिकेतील एखाद्या कर्मचाऱ्याने अन्य सम संवार्गीय महानगरपालिकेतील पदावर बदलीने नियुक्तीसाठी अर्ज केल्यास, अधिनियमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपलिकांतील नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील, अशा अटी व शर्तीवर, खालील बाबींच्या अधीन राहून बदलीने नियुक्ती देता येईल.

(अ) पदोन्नतीने भरण्यात येणाऱ्या पदांवर बदलीने नियुक्ती करता येणार नाही. फक्त नामनिर्देशनाने नियुक्तीकरिता राखून ठेवण्यात आलेल्या समसंवर्गीय व समान वेतन श्रेणीच्या पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

(ब) अशी नियुक्ती झाल्यानंतर त्या पदधाराकाचे ज्येष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (Zero Seniority) राहील.

(क) गट – "अ" आणि गट – "ब" मधील अधिकाऱ्यांच्या बाबत एका महानगरपालिकेतून पुणे महानगरपालिकेत बदलीचा निर्णय दोन्ही महानगरपालिकांच्या परस्पर संमतीने निश्चित अटी व शर्तीवर, शासन मान्यतेने घेतला जाईल.

(ड) केवळ विहित प्रक्रियेद्वारे व शासन मान्य पदावर नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांच्याच विचार करता येईल."

परसेवेतील अधिकारी/कर्मचारी यांना पुणे महानगरपालिका सेवेत सामावून घेतल्यावर त्यांची मागील सेवा जोडून घेणे, निवृत्ती वेतन योजना / परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू करणे, पुढील सेवेत अनुज्ञेय होणारे सेवा लाभ देणे, वेतन निश्चिती करणे इत्यादीकरिता मान्य धोरणानुसार कार्यवाही केली जाते. तथापि, याकरिता आवश्यक कागदपत्रे, दाखले, ना हरकत पत्रे अगोदरच उपलब्ध न केल्याने नंतर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते.

त्यानुषंगाने आवश्यक कागदपत्रे व कार्यपद्धती निश्चित करण्याची आवश्यकता निर्माण झालेली असल्याने राज्य/केंद्र शासन सेवेतील अथवा राज्य/केंद्र शासनाच्या स्वायत्त संस्थेतील अधिकारी/कर्मचारी यांनी पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील विविध पदांवर कायमस्वरूपी सामावून घेणेची मागणी करताना सादर करण्याची अगोदरच्या संस्थेचे कार्यालयाकडील माहिती, तसेच वैयक्तिक माहिती, विहित अर्ज इत्यादी सोबतचे नमुन्यात निश्चित करून या परिपत्रका सोबत प्रसृत केलेला आहे.

यापुढे या परिपत्रकानुसारच पुणे महानगरपालिका सेवेत परसेवेतून येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना सामावून घेण्यात यावे.

(शेखर गायकवाड)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका